| MHPU07-004061-2024 | दाखल दिनांक | १०/०६/२०२४ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | १०/०६/२०२४ |
| | निकाल दिनांक | २९/०७/२०२६ |
| | कालावधी | **०२ व, ०१ म, १९ दि.** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोहमार्ग न्यायालय, पुणे**
**यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी एन.जे.चव्हाण)**

**नमुना क्र. ३२**
**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**
**[ परिच्छेद ४४(i) भाग ६ फौजदारी नियमावली ]**

**नि.फौ.प्र.क्र.१२१/२०२४** **निशाणी क्र. ३०**

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल तपशील | लोहमार्ग पोलिस ठाणे, पुणे येथील गु.क्र. २१६/२०२० नुसार **कलम ३७९ व कलम ४११** भा.दं.वि. प्रमाणे तक्रार दाखल. |
| तक्रारदार | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत<br>वरीष्ठ पोलीस निरीक्षक<br>लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे. |
| मार्फत | श्रीमती ए. एस. काळे विद्वान सरकारी अभियोक्ता, लोहमार्ग न्यायालय, पुणे. |
| आरोपी | **प्रकाश पालगोविंद मुखीया**<br>वय - ३० वर्षे, व्यवसाय – मजुर,<br>रा.- ताडीवाला रोड, पुणे. |
| मार्फत | आरोपीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. ए. टी. नावडकर |

**भाग – ब**
**[ परिच्छेद ४४(ii) भाग ६ फौजदारी नियमावली ]**

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २९/०७/२०२३ |

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २९/०७/२०२३ |
| दोषारोपपत्राची तारीख | १०/०६/२०२४ |
| आरोप ठेवल्याची तारीख | ०२/१२/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २२/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | - |
| न्यायनिर्णयाची तारीख | २९/०७/२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असेल तर | - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | दोषी किंवा निर्दोषी | लादलेली शिक्षा | खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी ४२८ फौ.प्र.सं. नुसार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपी | **प्रकाश पालगोविंद मुखीया** | ०९/०१/२०२४ | ०९/०१/२०२४ | भा.दं.वि. १८६० चे **कलम ४११** | **निर्दोष** | - | - |

## भाग - क

## अभियोगपक्ष, बचावपक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी
## [ परिच्छेद ४४(iii) भाग ६ फौजदारी नियमावली ]

| **क्रमांक** | **नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| अभियोगपक्ष सा.क्र.१ | सेल्वामबाल कवंडर | १३ | फिर्यादी |
| अभियोगपक्ष सा.क्र.२ | विक्रम विश्वास मधे | १९ | साक्षीदार |
| अभियोगपक्ष सा.क्र.३ | अशोक लालासाहेब पायाळ | २० | जप्ती पंच |
| अभियोगपक्ष सा.क्र.४ | आनंद संभाजी कांबळे | २४ | तपासीक अंमलदार |

## अभियोगपक्षातर्फे कागदोपत्री पुरावा

| **अनु.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १४ | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| २. | २१ | जप्ती पंचनामा |
| ३. | २५ | अटक पंचनामा |

**जप्त मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमालचा क्रमांक | मुददेमालाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ५२/२०२४ | गॅलक्सी एम/१० एस निळया रंगाचा मोबाईल |

**न्या य नि र्ण य**
**(दिनांक २९/०७/२०२६ रोजी अधिघोषित)**

भारतीय दंड विधान, १८६० चे **कलम ४११** अंतर्गत आरोपीवर संपरिक्षा चालविण्यात येत आहे. (यापुढे सोईकरिता भा.दं.वि. संबोधण्यात येईल.)

२. **अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की,**

फिर्यादी सौ. सल्वाबाल राजेंद्रन कवंडर ह्या दि. २९/०७/२०२३ रोजी ०१.४५ वाजण्याच्या सुमारास दादर-पद्दुचेरी एक्सप्रेस गाडी नं. ११००५ च्या बोगी क्र. बी/२, सिट क्र. ३१ वरुन प्रवास करीत असताना एका इसमाने फिर्यादी यांची पर्स ज्यात रोख रक्कम १६,०००/- व गॅलक्सी एम/१० एस निळया रंगाचा ९०००/- रुपये किंमतीचा मोबाईल व इतर कागदपत्रे असा एकुण ४५,४००/- रुपये किंमतीचे सामान मुद्दाम लबाडीने विनापरवानगी घेवुन चोरी केले. त्यानंतर फिर्यादी यांनी लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे जावुन अज्ञात इसमा विरुध्द फिर्याद दिली असल्याने गुन्हा क्र. ४४५/२०२३ भा.दं.वि. कलम ३७९ व कलम ४११ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला होता. तपासी अधिकारी श्री. ए. एस. कांबळे - पोलीस हवालदार, लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे यांनी सदर घटनेचा तपास केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, फिर्यादीकडे घटनेबाबत चौकशी करुन आरोपीस अटक करुन अटक पंचनामा तयार केला. आरोपीच्या ताब्यातील मुद्देमाल पंचा समक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. पंचाचे जबाब नोंदवले. तपासाअंती त्यांना ज्या व्यक्तीने मोबाईल चोरी केला होता ती व्यक्ती मिळुन आली नाही. परंतु, प्रस्तुतचा आरोपी नामे प्रकाश पालगोविंद मुखीया याने सदरचा मोबाईल हा चोरीचा आहे हे माहिती असुन देखील त्याने तो मोबाईल विकत घेतल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने

आरोपीविरुद्ध गुन्हा कलम ४११ भा.दं.वि. प्रमाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

३. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुद्ध भा.दं.वि. चे **कलम ४११** अनुसार **निशाणी क्र. ६** वर दोषारोप ठेवलेला आहे. त्यातील मजकूर आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगीतला, परंतु आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे प्रतिकथन करुन फौजदारी संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण ४ साक्षीदार तपासले आहेत. गुन्हा सिध्द होईल इतपत तोंडी व कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणल्यानंतर अभियोगपक्षा मार्फत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी **नि.क्र. २७** वर पुरसीस दाखल करुन पुरावा बंद करण्याची विनंती केली. त्यानुसार दि. ३०/१०/२०२५ रोजी अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपीविरुध्द तोंडी व कागदोपत्री पुरावा आणल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन **नि.क्र. २९** वर दि. ०३/०२/२०२६ रोजी नोंदविण्यात आले आहे. आरोपीचा बचाव हा त्यास खोट्या प्रकरणात गोवल्याचा आहे.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या प्रकरणाच्या अंतिम निकालाचे अनुषंगाने निम्नलिखीत मुद्दे माझे विचाराधीन उद्भवतात. त्याचे सकारण निष्कर्ष मी पुढील प्रमाणे नोंदवत आहे -

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, फिर्यादी हे दि. २९/०७/२०२३ रोजी ०१.४५ वाजण्याच्या सुमारास दादर-पडऊचेरी एक्सप्रेस गाडी नं. ११००५ च्या बोगी क्र. बी/२, सिट क्र. ३१ वरुन प्रवास करीत असताना अज्ञात व्यक्तीने चोरलेला फिर्यादी यांचा गॅलक्सी एम/१० एस निळया रंगाचा ९०००/- रुपये किंमतीचा मोबाईल आरोपीने सदरचा मोबाईल चोरीचा आहे हे माहिती असुन देखील अप्रमाणीकपणे तो विकत घेवुन स्वतः जवळ बाळगला व अशा प्रकारे भा.दं.वि. चे **कलम ४११** प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २. | अंतीम आदेश काय ? | **अंतीम आदेशानुसार** |

## कारणमिमांसा

५. अभियोगपक्षाने आरोपीविरुद्ध दोषारोप सिध्द करण्याकरीता साक्षीदार क्र. १ सेल्वामबाल कवंडर यांना **नि.क्र. १३** वर, साक्षीदार क्र. २ विक्रम विश्वास मधे यांना **नि.क्र. १९** वर, साक्षीदार क्र. ३ अशोक लालासाहेब पायाळ यांना **नि.क्र. २०** वर व साक्षीदार क्र. ४ आनंद संभाजी कांबळे यांना **नि.क्र. २४** वर तपासले आहे. अभियोगपक्षाने अभिलेखावर **नि.क्र. १४** तक्रार, **नि.क्र. २१** जप्ती पंचनामा व **नि.क्र. २५** अटक पंचनामा हे दस्ताऐवज भारतीय पुरावा कायद्याच्या तरतुदीनुसार सिध्द केलेले आहेत.

**मुद्दा क्र.१ करीता-**

६. आरोपीविरुध्द प्रस्तुतचा गुन्हा सिध्द करण्याकरीता भारतीय दंड संहितेचे कलम ४१० या ठिकाणी पुर्नरोत्पादीत करणे गरजेचे आहे ते पुढील प्रमाणे -

> **कलम ४१० - "एखादी मिळकत चोरी किंवा बलाद्ग्रहण किंवा खंडणी यामुळे जिचा कब्जा हस्तांतरित झाला आहे ती मालमत्ता आणि जिचा फौजदारीपात्र अपहार झाला आहे, किंवा जिच्या बाबतीत फौजदारीपात्र न्यासभंग करण्यात आला आहे अशी मालमत्ता चोरीची मालमत्ता म्हणून संबोधण्यात येते. मग भारतात वा भारताबाहेर कोठेही ते हस्तांतर झालेले असो, अथवा तो अपहार किंवा न्यासभंग कोठेही करण्यात येतो; पण अशी मालमत्ता त्यानंतर जर, तिचा कब्जा घेण्यास विधित: हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या कब्जात आली तर, ती चोरीची मालमत्ता असण्याचे बंद होते."**

७. कलम ४१० भा.दं.वि मध्ये चोरीची मिळकत म्हणजे काय याचे विश्लेषण केले आहे. जो व्यक्ती चोरीची मिळकत स्वतःजवळ अप्रामाणीकपणे बाळगतो त्या व्यक्तीस **कलम ४११** भा.दं.वि प्रमाणे ३ वर्षाची शिक्षा किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही देण्यात येतात. त्यामुळे या ठिकाणी कलम ४११ देखील पुर्नोत्पादीत करणे गरजेचे ठरते.

**कलम ४११ - "कोणतीही चोरीची मालमत्ता, ती चोरीची मालमत्ता आहे हे माहीत असताना किंवा तसे समजण्यास कारण असताना जो कोणी अप्रामाणिकपणाने ती स्वीकारील किंवा ठेवून घेईल, त्याला तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या तरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील."**

८. भारतीय दंड संहितेच्या कलम ४१० मध्ये दिलेल्या चोरीची मालमत्तेच्या व्याख्येनुसार आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता पुढील बाबी संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करणे गरजेचे असते-

i) संबंधीत मिळकत चोरीची आहे

ii) संबंधीत मिळकत आरोपीच्या ताब्यात मिळुन आली

iii) आरोपीस त्या मिळकतीबाबत ती चोरीची असल्याचे माहिती होती किंवा तसे मानण्याचे कारण होते.

९. प्रस्तुतच्या प्रकरणातील संबंधीत मिळकत ही गॅलक्सी एम/१० एस निळया रंगाचा मोबाईल आहे. सदरचा मोबाईल हा चोरी झालेला मोबाईल आहे हे दर्शवण्याकरीता अभियोगपक्षाने सेल्वामबाल कवंडर - फिर्यादी यांना **नि.क्र. १३** वर तपासले आहे. त्यांनी त्यांचे पुराव्यात कथन केले की, घटना दि. २८/०७/२०२३ रोजी पुद्दुचेरी एक्सप्रेसमध्ये घडली आहे. ते दादरवरुन तिरुनलामलाई येथे ट्रेनने जात होते त्यावेळी ते ट्रेनमध्ये झोपले होते तेव्हा त्यांची हँडबॅग कोणीतरी चोरी केली. चोरी अंदाजे रात्री ०१.३० वाजता झाली होती. त्यांचे बॅगमध्ये सोन्याची २ ग्रॅमची एक अंगठी, १८,०००/- हजार रुपये, चष्मा व सॅमसंग कंपनीचा मोबाईल इत्यादी सामान होते. ट्रेनमधील सहप्रवाशाने त्याबाबतची तक्रार दिल्यानंतर पोलीसांनी त्यांचा **नि. क्र. १४** वरील जबाब ट्रेनमध्येच घेतला होता. दोन ते तीन महिन्यानंतर त्यांना पोलीसांचा फोन आला होता त्यावेळी ते गावी होते. पोलीसांनी त्यांना न्यायालयात येण्यास सांगितले. त्यांना मुद्देमाल क्र.५२/२०२४ मधील जप्त मोबाईल फोन दाखवला असता तो तोच असल्याचे त्यांनी सांगितले.

१०. आरोपीच्या विद्वान वकीलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यात

साक्षीदाराने कथन की, त्या झोपल्या असल्यामुळे त्यांची बॅग तसेच मोबाईल कोण घेवुन गेले हे त्यांना माहिती नाही. पोलीसांनी त्यांना आरोपी कोण होता हे कधीही दाखवले नाही.

११. अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. २ विक्रम विश्वास मधे यास **नि.क्र. १९** वर तपासले आहे. त्यांनी त्यांचे पुराव्यात कथन केले की, जानेवारी २०२४ मध्ये ते लोहमार्ग पोलीस स्टेशन पुणे येथे पोलीस शिपाई म्हणुन कार्यरत असताना दि. ०९/०१/२०२४ रोजी ते दिवसपाळी ड्युटीवर होते. त्यादिवशी गुन्हा क्र. ४४५/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि या गुन्ह्यामध्ये ट्रेसींग प्राप्त झालेले इसम नामे प्रकाशकुमार मुखीया, वय – ३० वर्ष, राहणार - ताडीवाला रोड, पोलीस चौकी जवळ यास फोनव्दारे पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले. त्यावेळी पोलीस हवलदार कांबळे यांनी मोबाईलबद्दल विचारपुस केली असता सॅमसंग गॅलक्सी एम-१० हा मोबाईल पुणे रेल्वे स्टेशन येथे एका अनोळखी इसमाकडुन विकत घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. पोलीस हवलदार कांबळे यांनी आयएमईआय नंबरची खात्री करुन दोन पंचा समक्ष सदरचा मोबाईल जप्त केला. तसेच प्रकाश मुखीया यास भा.दं.वि कलम ४११ नुसार अटक केली. सदरचा मोबाईलमध्ये सीमकार्ड त्याचे बहीण नामे सिमादेवी हिचे नावे होते. सदरच्या प्रकरणाची कारवाई त्यांचे समक्ष करण्यात आली होती. पोलीसांनी त्यांचा जबाब दि. ०९/०१/२०२४ रोजी श्री. कांबळे यांनी नोंदवला असल्याचे त्याने सांगितले.

१२. आरोपीच्या विद्वान वकीलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यात साक्षीदाराने कथन केले की, ट्रेसींग प्रस्तुतच्या आरोपीचे नावे आले नव्हते. आरोपीने त्यांना सदर मोबाईल खरेदी केल्याची पावती देवु केल्याचे कथन त्यांनी नाकारले. सदरचा मोबाईल चोरीचा होता हे प्रस्तुतच्या आरोपीला माहिती नसल्याचे त्याने पोलीसांना सांगितल्याचे कथन त्यांनी मान्य केले. तसेच सदरचा मोबाईल चोरीचा असता तर त्याने खरेदी केला नसता हे देखील त्याने त्यांना सांगितले होते.

१३. अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. ३ अशोक लालासाहेब पायाळ - जप्ती पंच यास **नि.क्र. २०** वर तपासले आहे. त्यांनी त्यांचे पुराव्यात कथन केले की, दि.०९/०१/२०२४ रोजी पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशनचे हवलदार कांबळे यांनी त्याला पंचनाम्याकामी लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे बोलावले होते. ट्रेसींगवरुन एक इसम त्यांनी ताब्यात घेतला होता. त्यांचेसोबत दुसरा पंच रघुनाथ गायकवाड हजर होता. ते गेले तेव्हा त्यांचे समक्ष त्यास नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव प्रकाश मुखीया असे सांगितले. त्याने त्याचे ताब्यातील मोबाईल सॅमसंग कंपनीचा आकाशी निळया रंगाचा मोबाईल हजर केला

होता. पोलीसांनी तो जप्त करुन **नि.क्र. २१** वरील जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी साक्षीवेळी आरोपीस न्यायालयात ओळखले.

१४. आरोपीच्या विद्वान वकीलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यात साक्षीदाराने कथन केले की, त्यांना कांबळे साहेबांनी फोन करुन बोलावले होते. त्यांचा व कांबळे साहेबांचा चांगला संपर्क आहे. या अगोदर ते पंच म्हणुन पोलीस स्टेशनला गेलेले आहेत व न्यायालयात साक्ष देखील दिलेली आहे. ते गेले तेव्हा पोलीस स्टाफ व आरोपी तेथे हजर असल्याचे त्यांनी मान्य केले. पंचनाम्यावर त्यांनी न वाचता सही केली. त्यांना जप्त मोबाईलचे मॉडेल नंबर व आयएमईआय क्रमांक सांगता येणार नाही. त्यांचे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन मोबाईल जप्त करण्यात आलेला नाही हे कथन त्यांनी नाकारले.

१५. अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. ४ आनंद संभाजी कांबळे - तपास अधिकारी यास **नि.क्र. १९** वर तपासले आहे. त्यांनी त्यांचे पुराव्यात कथन केले की, सन २०२४ साली त्यांची नेमणुक पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार पदावर होती. गु. र. नं. ४४५/२०२३ कलम ३७९,४११ भा.द.वि चा तपास त्यांच्याकडे देण्यात आला होता. **नि. क्र. १४** वरील फिर्याद त्यांना दाखवली असता ती त्यांनी ओळखली. त्यांना तपासामध्ये गुन्हयात मोबाइलचे ट्रेसींग प्राप्त झाले. मोबाईल हा गॅलक्सी कंपनीचा निळया रंगाचा होता. ट्रेसींग राधादेवी यांच्या नावे प्राप्त झाले होते. त्यांनी त्यांना कॉल केला असता ते बिहार येथे होते. फोनवर सांगितल्याप्रमाणे त्यांनी मोबाईल त्यांचे नातेवाईक प्रकाश मुखीया यांच्या सोबत पाठवुन दिला. सदर मोबाईलवर फोन केला असता तो पुणे रेल्वे स्टेशन येथे साफसफाई करणा-या कर्मचा-याकडे मिळुन आला. त्यानुसार त्यांनी पोलीस स्टेशनला हजर केला. सदरील मोबाईल या गुन्ह्यातला असल्याने प्रकाश मुखीया यांना दोन पंचांसमक्ष अटक करुन पंचनामा केला व त्याच्या ताब्यातील मोबाईल जप्त करून **नि. क्र. २१** वरील पंचनामा तयार केला. त्यांना **नि. क्र. २५** वरील दिनांक ०९/०१/२०२४ रोजीचा अटक पंचनामा दाखवला असता त्यावर त्यांची स्वाक्षरी असल्याचे त्यांनी सांगितले.

१६. साक्षीदार पुढे कथन करतो की, तपास झाल्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यांच्या तपासात मला असे निष्पन्न झाले की, आरोपीने प्रस्तुतचा मोबाईल चोरी केलेला आहे. त्यांनी आरोपीला साक्षीवेळी न्यायालयात ओळखले.

१७. आरोपीच्या विद्वान वकीलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यात साक्षीदाराने कथन केले की, तपास त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी फिर्यादीला बोलावले होते व त्याचा पुरवणी जबाब नोंदविला होता. त्यांनी दिनांक १५/०१/२०२४ रोजी त्यांचा जबाब नोंदविला. त्यांनी त्यांच्याकडुन मोबाईलचे बिल हस्तगत केलेले नाही. आरोपीच्या नावे ट्रेसींग प्राप्त झाले नसल्याचे कथन त्यांनी नाकारले. घटना पुणे रेल्वे स्टेशन येथे घडली आहे. पुणे रेल्वे स्टेशनवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत. त्यांनी तपासामध्ये सीसीटीव्ही फुटेज पाहिले नाहीत तसेच हस्तगत केलेले नाहीत. पंच अशोक आणि महेश त्यांच्या परिचयाचे असल्याचे त्यांनी नाकारले. प्रस्तुतच्या आरोपीने चोरी केली नसल्याचे त्यांनी मान्य केले. या आरोपीकडुन कोणताही मोबाईल हस्तगत केला नसल्याचे व मुळ आरोपी मिळुन न आल्याने या आरोपीविरूध्द खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन त्यांनी नाकारले.

१८. अभियोगपक्षाने अभिलेखावर एकुण ४ साक्षीदार तपासलेले आहेत. फिर्यादी यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरची घटना दि. २९/०७/२०२३ रोजी रात्री ०१.३० च्या सुमारास पुद्दुचेरी एक्सप्रेसमध्ये घडलेली आहे. घटनेची तक्रार त्यांच्या सह प्रवाशाने दिलेली आहे व पोलीसांनी त्यांचा जबाब ट्रेनमध्येच घेतलेला आहे. त्यांनी पुराव्याच्या वेळी सदरील मोबाईल आर्टिकल अ त्यांचाच असल्याचे कथन केले, परंतु त्यांची मालकी दर्शवणारा कुठलाही पुरावा त्यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच त्यांच्या पुराव्यात हे देखील आले आहे की, सदरील मोबाईल पोलीसांनी कोणत्या व्यक्तीकडुन हस्तगत केला ते त्यांना कळवलेले नाही.

१९. साक्षीदार क्र. २ हे पोलीस कर्मचारी असुन त्यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतच्या आरोपीस त्यांनी मोबाईल सह पोलीस स्टेशनला या असे सांगितले होते. मोबाईल जप्तीची कारवाई त्यांचे समक्ष झाली होती. सदरील मोबाईल जप्त केला तेव्हा त्यामध्ये सिमादेवी हीचे सिमकार्ड असल्याचे त्यांना सांगिलेले आहे.

२०. साक्षीदार क्र. ३ अशोक पायाळ - जप्ती पंच यांचे पुराव्याचे अवलोक केले असता असे दिसुन येते की, ते पंचनाम्याकामी पोलीस स्टेशनला नेहमी जात असता, तसेच त्यांची व पोलीस कर्मचा-यांची चांगली ओळख आहे. सदरील साक्षीदारास मोबाईलचा मॉडेल क्रमांक व आयएमईआय क्रमांक सांगता आलेला नाही. त्यांचा पोलीसांशी असलेल्या चांगल्या

संपर्कमुळे ते पोलीसांना मदत व्हावी याकरीता आरोपीविरुध्द साक्ष देवु शकतात याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्या पुराव्यावरुन जप्ती पंच हे निष्पक्ष साक्षीदार नसल्याचे व अभियोगपक्षाच्या कथनात त्यांना स्वारस्य असल्याचे देखील दिसुन येते.

२१. साक्षीदार क्र. ४ तपास अधिकारी यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, त्यांनी फिर्यादीकडुन मोबाईलचे बिल हस्तगत केलेले नव्हते तसेच त्यांना प्रस्तुतच्या आरोपीच्या नावाचे ट्रेसींग देखील प्राप्त झालेले नव्हते. त्यांनी ट्रेनमधील कुठल्याही रेल्वे कर्मचा-याचे तसेच ज्या सहप्रवाशाने फिर्यादीकरीता तक्रार दिली होती त्याचा देखील जबाब नोंदवल्याचे दिसुन येत नाही. ज्या व्यक्तीच्या नावे ट्रेसींग प्राप्त झाले होते त्या व्यक्तीस या प्रकरणात आरोपी करण्यात आलेले नाही किंवा त्याबाबत कुठलाही तपास केलेला दिसुन येत नाही. तपास अधिका-याने प्रस्तुतच्या आरोपीकडुन मोबाईल पोलीस स्टेशनमध्ये जप्त केल्याचे दिसुन येते. यावरुन प्रथमदर्शी प्रस्तुतच्या गुन्हयात झालेला तपास व जप्ती पंचनामा यावर संशय निर्माण होतो. तपास अधिका-याने केलेल्या तपासात मोबाईल कोणी चोरला होता ही बाब आजतागायत अभिलेखावर आलेली नाही. त्यावरुन चोरीची घटना घडली होती किंवा कसे याबाबत संशय निर्माण होतो. प्रस्तुतच्या प्रकरणात तपास अधिका-याने कुठल्याही स्वतंत्र साक्षीदाराचे जबाब नोंदवलेले नाहीत. फिर्यादी व इतर तिन्ही साक्षीदार हे अभियोगपक्षाच्या कथनात स्वारस्य असलेले साक्षीदार आहेत. त्यांचा तोंडी पुरावा आरोपीविरुध्द प्रस्तुतचा गुन्हा सिध्द करण्याकरीता पुरेसा नसल्याचे दिसुन येत आहे.

२२. अभियोगपक्षास आरोपीविरुध्द कलम ४११ भा.दं.वि प्रमाणे गुन्हा सिध्द करण्याकरीता फिर्यादीचा मोबाईल हा चोरीची मिळकत होती हे सर्वप्रथम सिध्द करणे गरजेचे होते. जप्त मोबाईल हा फिर्यादीचा मालकीचा असल्याचे अभियोगपक्षाने फिर्यादीच्या तोंडी पुराव्यातुन तसेच अभिलेखावर असलेल्या फिर्याद व प्रथम खबरी अहवालावरुन सिध्द केलेले आहे. फिर्यादीने सदरचा मोबाईल न्यायालया समक्ष ओळखलेला देखील आहे. परंतु, सदरच्या मोबाईलची चोरी करण्यात आली होती ही बाब अभियोगपक्ष संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करु शकलेला नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात ज्या व्यक्तीने मोबाईल चोरी केला होता त्या व्यक्तीबाबत कुठलाही तपास झालेला नाही. ज्या व्यक्तीकडुन आरोपीने मोबाईल विकत घेतला

होता त्याबाबत देखील कुठलाही तपास करण्यात आलेला नाही. ज्या ट्रेसींग रिपोर्ट आधारे तपास अधिका-याने आरोपीस पोलीस स्टेशनला बोलावुन घेतले होते ते ट्रेसींगचे रिपोर्ट भारतीय पुरावा कायद्याच्या तरतुदींप्रमाणे अभिलेखावर सिध्द झालेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतच्या आरोपीकडुनच ट्रेसींग आधारे मोबाईल जप्त करण्यात आला ही बाब संशयास्पद वाटते.

२३. तपास अधिकारी व पोलीस कर्मचारी विक्रम मधे यांच्या पुराव्यातुन असे दिसुन येते की, आरोपीने सदरचा मोबाईल विकत घेतला असल्याचे त्यांना सांगितले होते. तसेच, सदरचा मोबाईल विकत घेत असताना तो चोरीचा मोबाईल आहे याबाबत त्याला कुठलीही माहिती नसल्याचे सांगितले होते. परंतु, त्याबाबत कुठलाही तपास, तपास अधिका-याने केलेला नाही. सदरचा मोबाईल कोणत्या व्यक्तीकडुन विकत घेतला होता ही बाब देखील अभिलेखावर आलेली नाही.

२४. अभिलेखावर आणलेला जप्त मोबाईल - **आर्टिकल अ** हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला असल्याची बाब साक्षीदार क्र. २, ३ व ४ यांच्या तोंडी पुराव्यातुन सिध्द झालेली आहे, परंतु त्यांच्या पुराव्यावर पुर्णपणे विसंबुन राहण्याच्या आधी हे देखील लक्षात घेणे गरजेचे आहे की, साक्षीदार क्र. २ व ४ हे पोलीस कर्मचारी आहेत. साक्षीदार क्र. ३ हा पोलीसांचा ठरलेला व नेहमीचा पंच साक्षीदार आहे. त्याने यापुर्वी देखील ब-याच प्रकरणात पोलीस स्टेशनला पंच म्हणुन मदत केलेली आहे. तसेच, न्यायालयात साक्ष दिलेली आहे. फिर्यादी व्यतिरीक्त इतर कोणीही स्वतंत्र साक्षीदार अभिलेखावर आलेला नाही. फिर्यादीला देखील मोबाईल कोणाकडुन जप्त झाला होता याबददल माहिती देण्यात आलेली नाही. महत्वाचे म्हणजे चोरीची घटना ही २८/०७/२०२३ रोजी घडलेली असुन मोबाईल दि. ०९/०१/२०२४ रोजी आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा मोबाईल घटनेच्या सहा ते सात महिन्यानंतर आरोपीकडुन जप्त करण्यात आला असल्याचे दिसुन येते. त्यामुळे दरम्यानच्या काळात सदरचा मोबाईल कोणाकडे होता व तो आरोपीच्या ताब्यात कसा आला याबाबतची पुराव्याची श्रृंखला अभियोगपक्षाने संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द केलेली नाही. आरोपीकडे मोबाईल विकत घेतल्याबाबतची पावती नसल्याने त्याने जाणीवपुर्वक व अप्रामणीकपणे सदरचा मोबाईल चोरीचा आहे हे माहिती असुन देखील विकत घेतला व

स्वतःजवळ बाळगला ही बाब सिध्द होत नाही. सदरची बाब अभियोगपक्षास संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करावी लागते. **भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ११४ स्पष्टीकरण - अ** नुसार आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्याकरीता सदरचा जप्त मोबाईल आरोपीच्या ताब्यातुन चोरीची घटना झाल्याच्या लगेचच जप्त होणे गरजेचे होते, परंतु या प्रकरणामध्ये आरोपीच्या ताब्यातुन जवळपास सहा ते सात महिन्यांनी मोबाईल जप्त झाला असल्याचे दिसुन येते. त्यामुळे दरम्यानच्या काळात सदरील जप्त मोबाईलच्या व्यवहाराबाबत व हस्तांतरणाबाबत अनेक गोष्टी घडल्या असतील ही बाब टाळता येणार नाही.

२५. अभियोगपक्षास हे सिध्द करणे गरजेचे होते की, मोबाईल चोरीचा आहे हे माहिती असताना देखील तो आरोपीने विकत घेतला होता. परंतु या प्रकरणात त्याबाबत कुठलाही योग्य पुरावा आलेला नाही. महत्वाचे म्हणजे चोरीची मिळकत स्वतःजवळ अप्रामाणीकपणे बाळगली ही बाब संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द होणे गरजेचे होते, परंतु आरोपीचा हेतु अप्रामाणीक होता हे दाखवण्यास अभियोगपक्ष कमी पडलेला आहे. चोरीची घटना सिध्द झाली नसल्याने मोबाईल चोरी केलेल्या व्यक्तीमध्ये व आरोपीमध्ये जप्त मालमत्तेबाबत व्यवहार झाल्याची बाब अभियोगपक्ष संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करु शकलेला नाही. गुन्हा कलम ४११ भा.दं.वि नुसार दोषारोप सिध्द करण्याकरीता आवश्यक असलेले घटक अभियोगपक्षाने संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द न केल्याने आरोपीस सदरच्या गुन्हयातुन निर्दोष मुक्त करणे न्याययोग्य ठरेल. सबब, वरील सर्व कारणांवरुन मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता-</u>**

२६. परिणामी, मी या निष्कर्षाप्रत पोहोचले आहे की, भा.दं.वि. **कलम ४११** नुसार आरोपीविरुद्ध शिक्षापात्र गुन्हा सिध्द करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांपैकी एकही घटक अभियोगपक्षाने संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द केलेले नाही. सबब, मुद्दा क्र.२ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपी नामे **प्रकाश पालगोविंद मुखीया** यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम |

| | |
|---|---|
| | २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे **कलम ४११** नुसार शिक्षापात्र गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपीस निर्देश देण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम **४३७-अ** नुसार वरिष्ठ न्यायालयात हजर राहण्याकरीता रुपये १०,०००/- चे बंधपत्र व जामिनपत्र नव्याने देण्यात यावे. सदरचे जामीनपत्र व बंधपत्र पुढील ६ महिन्यासाठी वैध राहील. |
| ४. | गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल गॅलक्सी एम/१० एस निळया रंगाचा मोबाईल हा मुळ मालकास पोलीस निरीक्षकांनी सुपूर्तनाम्यावर दिला असल्याने त्याचा ताबा नियमाप्रमाणे मुळ मालकाकडे अपील कालावधीनंतर नियमानुसार कायम करण्यात येतो. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.29 16:41:34 +0530

**(एन. जे. चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

पुणे.
दि. २९/०७/२०२६

## <u>प्र मा ण प त्र</u>

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | आर.आर.क्षिरसागर<br>लघुलेखक (श्रेणी III) |
| न्यायालयाचे नाव | - | एन.जे.चव्हाण<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>लोहमार्ग न्यायालय, पुणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | - | २९/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकाऱ्याने न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख | - | २९/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | - | २९/०७/२०२६ |